तरुण भारत संवाद

रविवार, ८ डिसेंबर २०२४

# किणीच्या सृष्टी चाळकेची ठाणे जिल्हा न्यायालयात कनिष्ठ सहाय्यकपदी निवड



घुणकी : किणी (ता हातकणंगले) येथील सृष्टी संजय चाळके हिची ठाणे जिल्हा व सत्र न्यायालय येथे कनिष्ठ सहाय्यकपदी निवड झाली आहे. सृष्टीचे कन्या विद्यामंदिर,किणी, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल,व विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगांव, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद महाविद्यालय,कोल्हापूर व आण्णासाहेब डांगे महाविद्यालय आष्टा येथून शिक्षण पूर्ण करून सेट परिक्षा उत्तीर्ण झाली आहे. सृष्टीला आई वडीलांसह कुटूंबाचे प्रोत्साहन लाभले.

09/12/2024

पुढारी | रविवार, ८ डिसेंबर २०२४

# 'विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून कुशल मनुष्यबळ घडविणारे शिक्षण महत्त्वाचे'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दर्जेदार शिक्षण हे केवळ जीवन बदलणारे नाही, तर मनाला कलाटणी देणारा व चारित्र्य घडवणारा अनुभव देते. विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून कुशल मनुष्यबळ घडविणारे शिक्षण महत्त्वाचे आहे, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेज आयोजित शैक्षणिक यात्रा-२०२४ उद्घाटनप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अॅड. नुसरत मुजावर यांनी दिव्यांग दिनाचे औचित्य साधत आर्थिक मदत केली. प्रा. शिल्पा भोसले यांनी स्वागत केले. प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. माधवी देशपांडे, प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

9.12